# महाराष्ट्र शासन

**ई-मेल द्वारे**
दुरध्वनी क्र. : ०२२-२२०१७१०६
E-mail: sopr४.rdd-mh@nic.in

क्र:गाजप्र-२०१९/प्र.क्र.८८/पंरा-४,
ग्रामविकास विभाग,
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.
दिनांक :- १८ ऑगस्ट , २०२०.

प्रति ,

१. जमाबंदी आयुक्त,पुणे
२. जिल्हाधिकारी,सर्व.
३. मुख्य कार्यकारी,अधिकारी,जिल्हा परिषद,सर्व.

**विषय:-** स्वामित्व योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक कार्यवाही करणेबाबत
**संदर्भ:- १.केंद्र शासनाचे पत्र दि.२८.४.२०२०.**
२. स्वामित्व योजनेच्या मार्गदर्शक सूचना

महोदय ,

उपरोक्त संदर्भीय शासन पत्रान्वये दि.२४ एप्रिल,२०२० रोजी पंचायत राज दिनी स्वामित्व योजना सुरु करण्यात आली आहे.उक्त योजनेच्या अमलबजावणीच्या अनुषंगाणे सबंधित विभाग यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. योजनेच्या योग्य अंमलबजावणीसाठी ग्रामविकास व पंचायती राज विभाग,महसूल विभाग,जमाबंदी आयुक्त कार्यालय व सर्वे ऑफ इंडिया यांनी योग्य तो समन्वय राखून कार्यवाही करावी.

२. कोविड-१९ चा प्रादुर्भाव विचारात घेऊन सर्वे ऑफ इंडिया व जमाबंदी आयुक्त कार्यालय यांना या योजनेची कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी परिस्थिती विचारात घेऊन योग्य तो कार्यवाही करावी.

३. केंद्रीय स्वामित्व योजनेकरिता जिल्हा स्तरावर, पंचायत समिती स्तरावर व गाव स्तरावर माहिती अपलोड करण्यासाठी नोडल ऑफिसर चे लॉगीन आयडी निर्माण करणे आवश्यक असल्यामुळे अनुक्रमे उपमुख्यकार्यकारी अधिकारी(पंचायत),गटविकास अधिकारी, पंचायत समिती व ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांना लॉगीन आयडी निर्माण करण्यासाठी प्राधिकृत करण्यास हरकत नाही.उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पंचायत),जिल्हा परिषद यांचे लॉगीन आईडी राज्यस्तरावरून करावयाची आहे त्याकरिता उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांची संपूर्ण नावे,पदनाम,मोबाईल क्रमांक,ई-मेल आईडी यांची माहिती सादर करण्यात यावी. सदर माहिती एकत्रित प्राप्त करून शासनास पाठविण्यासाठी संचालक,राष्ट्रीय ग्रामीण स्वराज्य अभियान,पुणे (ई-मेल:- spdmaharashtra@gmail.com) यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. पंचायत समिती स्तरावरील नोडल ऑफिसर चे लॉगीन आईडी निर्माण करावयाची कार्यवाही उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पंचायत) यांनी करावयाची असून ग्रामपंचायत स्तरावरील नोडल ऑफिसरचे लॉगीन आयडी निर्माण करावयाची कार्यवाही सबंधित गट विकास अधिकारी यांनी करावयाची आहे. तरी उक्त लॉगीन आईडी निर्माण करण्यासाठी आवश्यक माहिती आपल्या अधिनस्ताकडून घेण्यात यावी. सर्व संबंधितांनी याबाबतची माहिती अद्ययावत करावयाची कार्यवाही वेळोवेळी करावयाची आहे.

४.या योजनेकरिता आवश्यक असणारी माहिती गटविकास अधिकारी यांनी स्थानिक तालुका भूमी अभिलेख कार्यालय यांच्याशी संपर्क साधून तात्काळ उपलब्ध करून द्यावी.

५.या योजनेच्या अंमलबजावणी करिता ग्रामसभेचे आवश्यकता असल्यास ज्या गावांमध्ये कार्यवाही प्राधान्याने करावयाची आहे त्या गावांमध्ये तालुका भूमी अभिलेख कार्यालयाशी संपर्क साधून विशेष ग्रामसभा आयोजित करावी आणि या योजनेच्या बाबतीत संबंधित गावांमध्ये जनजागृती करावी.

आपला

२८/०८/२०२०

(संतोष कराड)

उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत-माहितीस्तव तथा आवश्यक कार्यवाहीबाबत

१. संचालक,राष्ट्रीय ग्रामीण स्वराज्य अभियान,पुणे.

२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पंचायत), जिल्हा परिषद,सर्व